**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक ०४ मार्च २०२५**

**ठळक बातम्या**

1. **मंत्री धनंजय मुंडे यांनी आज दिला मंत्रिपदाचा राजीनामा, उशिरा राजीनामा दिल्याची विरोधकांची टीका.**
2. **अबु आझमी यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून महाराष्ट्राच्या विधानसभेत गदारोळ, दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब.**
3. **प्रामाणिक प्रयत्न आणि मेहनत केल्यास यश निश्चित - राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांचे नागपुरात माफसूच्या दीक्षांत सोहळ्यात प्रतिपादन.**
4. **भारतीय भू-सर्वेक्षण संस्था - जीएसआय नागपूरचा 175 वा स्थापना दिवस साजरा.**

---------------------------------

**धनंजय मुंडे राजीनामा**

**राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांनी आज मंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यांचा राजीनामा आपण स्वीकारला असून, पुढच्या कारवाईसाठी राज्यपालांकडे पाठवण्यात आल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. विधीमंडळ परिसरात ते वार्ताहरांशी बोलत होते.**

***आज राज्याचे मंत्री श्री धनंजय मुंडे यांनी माझ्याकडे आपला राजीनामा दिलेला आहे. त्यांचा राजीनामा मी स्विकारलेला आहे आणि पुढील कारवाई करता तो माननीय राज्यपाल महोदयांकडे पाठवलेला आहे. त्यामुळे मंत्री धनंजय मुंडे यांना राजीनामा स्वीकारून या ठिकाणी मुक्त करण्यात आलेलं आहे.***

**बीड जिल्हयातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणातले आरोपी मुंडे यांच्या संपर्कातले असल्याचं सांगत त्यांच्या राजीनाम्याची मागणी देशमुख कुटुंबिय, मस्साजोग ग्रामस्थ तसंच विरोधकांकडून करण्यात येत होती. दरम्यान, या हत्या प्रकरणाचे फोटो व्हायरल झाल्यामुळे आज नागरीकांनी बीड जिल्हा बंदची हाक दिली आहे. जिल्हयात कडकडीत बंद पाळण्यात येत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. या घटनेच्या निषेधार्थ नागरीकांनी बीड**

शहरातून रॅली काढली. आमदार सुरेश धस आणि संदीप क्षीरसागर यांनी या बंदला पाठिंबा दिला आहे. या प्रकरणातल्या आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी धस यांनी विधीमंडळ परिसरात वार्ताहरांशी बोलताना केली.  सरकारने राजीनामा घेण्यास दोन महिने वेळ घेतला, त्यामुळे हा नैतिकतेच्या आधारावर राजीनामा असू शकत नाही, अशी टीका विरोधकांनी केली आहे.  दरम्यान, वैद्यकीय कारणास्तव राजीनामा दिला असल्याचं मुंडे यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातल्या आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, ही आपली पहिल्या दिवसापासूनची ठाम मागणी असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. संतोष देशमुख हत्येप्रकरणी पुरावे असूनही कारवाईला उशीर केल्याचा आरोप करत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला, परंतू त्यांना बडतर्फ का केलं नाही असा प्रश्न त्यांनी विचारला.  धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्याच्या पार्श्वभूमीवर आज राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री आणि धनंजय मुंडे यांच्या भगिनी पंकजा मुंडे यांनी नागपूर येथे महाराष्ट्र पशुवैद्यकीय आणि मत्स्य विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभानंतर प्रतिक्रिया दिली.

*मी त्याचेही स्वागत करते  हा राजीनामा फार आधी व्हायला पाहिजे होता. ह्या राजीनामापेक्षा शपथच नाही व्हायला पाहिजे होती. त्या सगळ्या गोष्टींना पुढचा भोगांना कदाचित समोर जावं लागलं नसतं घेणाऱ्यानी सुद्धा आधी घ्यायला पाहिजे होता धनंजयने सुद्धा आधी द्यायला पाहिजे होता या सगळ्या वेदनांपासून कदाचित गरिमामय त्याला एक मार्ग मिळाला असता.*

दरम्यान, राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांनी मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा मंजूर केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शिफारशीवरून राज्यपालांनी मुंडे यांचा राजीनामा स्वीकारला.

---------------------------------

अर्थसंकल्पीय अधिवेशन

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशीचं कामकाज सत्ताधारी पक्षांच्या आमदारांच्या गदारोळानंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. विधानसभेचं कामकाज सुरू झालं, तेव्हा समाजवादी पार्टीचे आमदार अबु आझमी यांच्या राजीनाम्याची मागणी करत सत्ताधारी

**आमदारांनी जोरदार घोषणाबाजी केली. आझमी यांनी मुघल शासक औरंगजेब याच्या समर्थनार्थ वक्तव्य केल्याचा आरोप करत सत्ताधारी आमदार महेश लांडगे, अतुल भातखळकर, गुलाबराव पाटील, सुधीर मुनगंटीवार यांनी टीका केली. गदारोळ वाढल्यामुळे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कामकाज दहा मिनिटांसाठी तहकूब केलं होतं. कामकाज सुरू झाल्यानंतर उद्योग मंत्री उदय सामंत यांनीही आझमी यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अबु आझमी हे देशद्रोही असून त्यांचं निलंबन करण्याची मागणी केली. आझमी यांनी वारंवार छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान केला आहे, असं ते म्हणाले ....**

***संभाजी महाराजांचा, शिवाजी महाराजांचा अपमान करणं म्हणजे हा अबू आझमी देशद्रोही आहे. देशद्रोही आहे आणि म्हणून या देशद्रोह्याला सभागृहामध्ये बसण्याचा अधिकार या देशद्रोही अबू आझमी याला नाही आहे.***

**अबू आझमी यांच्या वक्तव्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेतही निवेदन केलं. यावर सरकारने कारवाई करावी असे निर्देश विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी दिले. त्यानंतरही सत्ताधारी आमदारांनी घोषणाबाजी सुरू ठेवल्यानं सभापतींनी कामकाज १५ मिनिटांसाठी तहकूब केलं. कामकाज सुरू झाल्यावर काँग्रेसचे भाई जगताप यांनी प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर यांच्यावरही कठोर कारवाई करण्याची मागणी केली. महापुरुषांचा अवमान करणाऱ्या सर्वांवर कठोर कारवाई करावी असे निर्देश सभापती राम शिंदे यांनी सरकारला दिले. सत्ताधारी सदस्यांचं आंदोलन सुरूच असल्याने सभापतींनी कामकाज उद्यापर्यंत तहकूब केलं. दरम्यान, अबू आझमी यांनी या वक्तव्याबद्दल माफी मागितली आहे.**

**----------------------------------**

**व्हेवज शिखर परिषद**

**व्हेवज शिखर परिषदेत आयोजित केलेल्या कॉमिक्स क्रिएटर स्पर्धेचे उपांत्य फेरीतले विजेते निवडण्यासाठी पाच सदस्यीय ज्युरी पॅनलची घोषणा करण्यात आली आहे. या स्पर्धेत सर्जनशीलतेला मोठा वाव आहे, असं या ज्युरींपैकी एक असलेले जजेल होमावजीर यांनी सांगितलं.**

**----------------------------------**

**माफसू दीक्षांत**

प्रामाणिक प्रयत्न आणि मेहनत घेतल्यास यश निश्चित मिळते, असा विश्वास राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी व्यक्त केला आहे. भारतातील दुग्ध क्रांती हे त्याचे प्रतीक असल्याचं त्यांनी नमूद केलं. नागपुरातील महाराष्ट्र पशु आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या बाराव्या दीक्षांत समारंभात मुख्य अतिथी म्हणून ते बोलत होते. भगवद्गीतेतील संदेशानुसार प्रामाणिक प्रयत्नांवर त्यांनी विशेष भर दिला.

*This white revolution has took its beginning nearly 50 years back and today we have achieved the top. So from this we can easily understand that any effort, whatever may be beside the effort, if it is a good effort and we continue that effort without worrying about the result, the result will come automatically.*

पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी, रोजगार निर्मितीसाठी आणि लाखो लोकांच्या उपजीविकेसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या कृषी संलग्न क्षेत्राचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी देश आणि समाजाच्या विकासात अनन्यसाधारण योगदान देण्याचे आवाहन राधाकृष्णन यांनी केले. विद्यापीठाच्या प्र-कुलपती आणि पशुसंवर्धन, पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, प्रख्यात शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्यासह अधिकारी-कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे पालक यावेळी उपस्थित होते. दरम्यान मुख्य अतिथी डॉ. अनिल काकोडकर यांनी प्राण्यांचे आरोग्य हे मनुष्याच्या आयुष्याशी आणि निर्सगाशी थेट संबंधित असून विविध प्राण्यांच्या जाती वातावरणीय बदल आणि अन्य आव्हानांचा सामना सक्षमपणे करू शकतील याबाबत अधिक विचारमंथन करण्यावर भर दिला.

---------------------------------

भारत ऑस्ट्रेलिया क्रिकेट

आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज उपांत्य फेरीतला पहिला सामना भारत आणि ऑस्ट्रेलिया संघादरम्यान दुबई इथं सुरू आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतलेल्या ऑस्ट्रेलिया संघाने 49.3 षटकात सर्वबाद 264 धावा उभारून भारतासमोर जिंकण्यासाठी 265 धावांचं उद्दिष्ट ठेवलं आहे.

---------------------------------

भारतीय भूसर्वेक्षण संस्था

केंद्रीय खाण मंत्रालयाच्या अंतर्गत एक प्रमुख भूविज्ञान संस्था असलेल्या नागपूरच्या सेमीनरी हिल्स स्थित भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण- जीएसआयच्या १७५ वा स्थापना दिवसाप्रसंगी दिनेश व्ही. गणवीर, अतिरिक्त महासंचालक, जीएसआय नागपूर विभागप्रमुख यांनी सांगितलं की जीएसआयचा सुरुवातीचा केंद्रबिंदू हा महत्त्वाचे बल्क मिनरल शोधणे हा होता, परंतु आता जीएसआयने क्रिटिकल मिनरलच्या शोधाकरिता आपले लक्ष केंद्रित केले आहे. जीएसआय आणि मिनरल एक्स्प्लोरेशन कार्पोरेशन लिमिटेड हे संयुक्तरीत्या क्रिटिकल मिनरल ब्लॉकच्या उत्खननामध्ये तसेच शोधामध्ये कार्यरत असून क्रिटिकल मिनरल्सवर इतर देशावर असणारं खनिज अवलंबित्व कमी करण्याच्या हेतूने आणि हरित ऊर्जेला चालना देण्याच्या हेतूने हे दोन्ही विभाग कार्य करत असल्याचे त्यांनी सांगितलं.

---------------------------------

हवामान

विदर्भात आज सर्वाधिक कमाल तापमान अकोला इथं 38.6 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. त्या पाठोपाठ चंद्रपूर इथं 38 अंश सेल्सिअस, गडचिरोली इथं 37 पूर्णांक दोन आणि यवतमाळ इथं 37 अंश सेल्सियस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. नागपूर इथं 36.9 तर अमरावती इथं 36.8 दशांश अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदविण्यात आलं.

---------------------------------